# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : १०/एनजीपी/ना-हरकत/२०१३/ १०४
दिनांक : 5 FEB 2013

**विषय :शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे इ. बाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, काही पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे इ. बाबतचे प्रस्ताव या संचालनालयास ऑनलाईन सादर केलेल आहेत. तथापी, शासनास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून खालील नमूद कागदपत्र किंवा त्यापैकी काही कागदपत्र अद्याप या संचालनालयास प्रस्तावांव्यतीरिक्त वेगळे सादर केलेले नाहीत, अशा सर्व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी खालील नमूद करण्यात आलेली कागदपत्र तात्काळ या संचालनालयास सादर करावीत.

१. सदर पदविका अभ्यासक्रम बंद/ अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे/ संस्था बंद करणेबाबत संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीच्या ठरावाची मुळप्रत.
२. पदविका अभ्यासक्रम बंद / अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे/ संस्था बंद करणेबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत.
३. संबंधीत अभ्यासक्रमासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्यात आलेल्या असल्यास सदर मुदतठेवींची साक्षांकित प्रत.
४. तसेच सदर अभ्यासक्रम बंद/ प्रवेशक्षमता कमी/ संस्था बंद केल्यानंतर प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणूक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास पूर्णपणे आपली संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे १०० रु च्या स्टँपपेपर संस्थेने केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

अन्यथा ज्या संस्थांकडून उपरोक्त कागदपत्र या संचालनालयास प्राप्त होणार नाही त्या संस्थांची पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे इ. बाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनास शिफारस केली जाणार यांची नोंद घ्यावी.

1235
12 FEB 2013

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

**महत्वाचे**

क.तंशिस / प्राकाना / शैवि / ना–हरकत / पदविका / 2013 / 435
दि. 13 FEB 2013

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासकमाच्या संस्था.

उपरोक्त विषयाबाबत पदविका अभ्यासकमांच्या संस्थांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.